जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०६.०६.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या दोन दलाल महिलांस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक ०५/०६/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की, हंसधाम को.ऑ.हौसिंग सोसायटी, कृष्ण नगर, उल्हासनगर-४ या ठिकाणी दोन महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे. सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून दोन दलाल महिलांना ताब्यात घेवुन त्यांच्या रखवालीत असलेल्या ०३ पिडीत महिलांची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत दोनही महिला आरोपींविरूध्द विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर ।३९७/२०२५ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३(१), १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध), गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी, मपोउपनि/स्नेहल शिंदे, पोउपनि/चव्हाण, श्रे. पोउपनि/क्षिरसागर, मसपोउपनि/कदम, सपोउपनि/वालगुडे, पोहवा/व्ही.आर.पाटील, सुवारे, किशोर पाटील, मपोअंम/खरात, चापोशि/पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर